# 'से नो टु बेंगलोर, येस टू बफेलो!'

सकाळ वृत्तसेवा

Sunday, October 17, 2010 AT 12:30 AM (IST)

Tags: baraq obama, gautam pangu, pailteer



**गौतम पंगू (लेक्सिंग्टन, अमेरिका)**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा सध्या चांगल्याच पेचात सापडले आहेत. त्यांनी निवडणूकीपूर्वी जनतेला "सत्तेवर येताच आपण अमेरिकेत आमूलाग्र बदल घडवून आणू' असे आश्वासन दिले होते. त्यांच्या प्रचारमोहिमेतल्या घोषणाच मुळी "द चेंज वुई नीड', "द चेंज वुई बिलीव इन' अशा स्वरूपाच्या होत्या. या घोषणांचा तेव्हा त्यांनी जनतेवर इतका मारा केला होता, की त्या काळात अमेरिकाभेटीसाठी आलेल्या एका पुणेकर गृहस्थांनी "म्हणजे अमेरिकेतसुद्धा आमच्या पुण्यासारखाच "चेंज'चा (म्हणजे सुट्ट्या पैशांचा) प्रॉब्लेम आहे वाटतं! आणि म्हणे ही जागतिक महासत्ता!' असा स्वत:च्या स्वभावधर्माला साजेलसा एक खवचट शेरा माझ्यासमोर मारला होता.

ते (म्हणजे ओबामा, पुणेकर गृहस्थ नव्हे!) सत्तेवर येताच सगळ्या अमेरिकेत उत्साहाचे आणि बदलाचे एकच वारे खेळायला लागले. पण दीड वर्ष होऊन गेलं आणि आता या वाऱ्याचा वेग मंदावत चाललाय. आपण चालतो आहोत ती वाट किती बिकट आहे, याची जाणीव ओबामांना व्हायला लागली आहे. परिस्थितीनं खिंडीत गाठलं की सगळे राजकारणी जे करतात तेच त्यांनी आता करायला सुरवात केली आहे. प्रत्येक बाबतीत त्या रिपब्लिकन पक्षाची "पण आई, दादानी माला आधी मारलं ना!' अशा सुरात तक्रार सांगत असतात. मध्येच भारत आणि चीनच्या नावानं शंख करायला सुरवात करतात. अलीकडेच त्यांनी आपल्याच मागच्या वर्षीच्या "से नो टू बेंगलोर, येस टू बफेलो!' या आऊटसोर्सिंगविरोधी घोषणेचा पुनरुच्चार केला. एका सिनेटरनं ओबामांची री ओढत काही कारण नसताना भारतीय आयटी कंपन्यांना "चॉप शॉप' म्हणजे चक्क चोर बाजाराची उपमा दिली. अमेरिकेच्या ओहायो स्टेटनं तर आऊटसोर्सिंगवरच बंदी घातली. पण याचा आपल्या आयटी उद्योगावर ढिम्म परिणाम झाला नाही. उलट त्यांनी "बघा अमेरिका आमच्या बुद्धीला आणि कौशल्याला कशी घाबरते!' असं म्हणून कॉलर ताठ करून घेतली. पण ओबामा ंचा बंगळूरद्वेष भलताच वाढत चाललाय. ते नोव्हेंबरमध्ये भारतभेटीला येणार आहेत, तेव्हा ते मुंबई, दिल्ली, आग्रा, इतकंच काय तर अगदी पट्टणकोडोली तालुक्यातील "भुताचे वडगाव' येथे अण्णासाहेब घोडके व्यायामशाळेच्या उद्घाटनासाठी आणि

संबंधित बातम्या

- कम्युनिकेशनचा बदलता चेहरा
- गुरुवंदना'ने भारावला अमेरिकेतील शिक्षकवृंद!
- न्यूक्लिअर डिसेप्शन : प्रकरण सोळावे(भाग ३)
- सिडनीचा ताजमहाल
- 'द ग्रेट बॅरियर रीफ' ॲट रिस्क!

ताज्या घडामोडी

- उकिरडा झालेल्या पालिकेचे पवित्र मंदिर बनवू या
- दोन सूर्य अनुभवलेला ग्रह
- लेखाजोखा यंदाच्या पुरुषोत्तमचा
- इराण, श्रीलंकेच्या नेत्यांशी पंतप्रधानांची चर्चा
- पंतप्रधानांना जाळ्यात ओढण्याचे प्रयत्न
- आज प्रणव मुखर्जी पंतप्रधानांना भेटणार

स्थानिक मल्लांबरोबर कुस्तीचे चार हात टाकण्यासाठी यायला पण तयार आहेत. पण कोणत्याही परिस्थितीत त्यांना भारताची "आयटी कॅपिटल' असलेल्या बंगळूरला भेट द्यायची नाही! वास्तविक बंगळूरबरोबर नाव जोडलं गेलेलं "बफेलो' हे न्यूयॉर्क राज्यातलं अमेरिका आणि कॅनडा यांच्या सरहद्दीवरचं एक छोटं शहर- बंगळूरच्या तुलनेत आकारानं आणि लोकसंख्येनं बरंच लहान. पण त्याचं नाव "ब'पासून सुरू होतं म्हणून त्याला उगाचच महत्त्व आलं. ओबामांच्या या घोषणेमुळं काही लोकांचा मात्र उगाचच गैरसमज झाला. आमच्या कोल्हापुरातल्या गंगावेस भागात दुधाच्या कट्ट्यावर खालील संवाद काही दिवसांपूर्वी कानावर पडला. "काल त्ये ओबामा काय म्हणलं वाचलंस व्हय रे संत्या?' "कालचा पेपर न्हाई वाचायला मी. श्रावण आणि गणपतीच्या मध्ये चार दिवस आल्यात, तेवढ्यात एक रस्सापार्टी करून घेतलो मी काल!' "मर्दा, रस्सापार्टी कसलं करत बसलंयस आता? ओबामा म्हणतंय आम्हाला अमेरिकेत बंगलोरचे आयटीवाले नकोत, म्हशी पाठवून द्या म्हशी!'

"काय सांगायलंयस लेका?'
"मग? त्ये म्हणलं "नो टू बेंगलोर, येस टू बफेलो!' त्याचंपण बरोबर हाय रे, तिकडं अमेरिकेत किनी, दूधबिध सगळं शिळं, पॅकमध्ये मिळतंय रे! आपल्यासारखं धारोष्ण दूध कुठलं मिळायला त्यांना! कुनीतरी सांगितलं असंल त्याला, समद्यास्नी ताजं दूध पाजा आणि बघा देशाची स्थिती सुधारतीया की नाही!'

"आयला एकदम नादखुळा माणूस आहे रे ओबामा! उद्याच मी माझ्या मुंबईच्या चुलत्याला फोन लावतो-म्हशीचा व्हिसा काढता येतो का ते विचारायला!'

आता कदाचित लवकरच अमेरिकन कॉन्सुलेटपुढं (काही वर्षांपूर्वी आयटीवाल्यांच्या लागायच्या तशा) म्हशींच्या रांगा लागतील. त्यांच्यामागोमाग "अगं अगं म्हशी, मला कुठं नेशी' म्हणत कदाचित त्यांचे मालकदेखील आत शिरकाव करून घ्यायचा प्रयत्न करतील. वास्तविक हवं तेव्हा एखाद्याला पैशांचं, शस्त्रांचं दूध पाजून जवळ करायचं आणि नको तेव्हा त्याच्याच अंगावर शिंगं उगारून धावून जायचं, हे अमेरिकेचं आंतरराष्ट्रीय धोरण बघता काही म्हशी इकडे आल्या तर फारसा फरक पडणार नाही.

काही उत्साही मंडळींनी तर ओबामांच्या या घोषणेची तुलना भारतीय स्वातंत्र्यलढ्यातल्या "स्वदेशी'च्या चळवळीशी केली. त्यांच्या मते ओबामांचा हा स्वदेशीचा आग्रहच अमेरिकेचा सुवर्णकाळ परत आणेल. अगदी आमच्या गल्लीतले बबनराव, ज्यांनी आयुष्यभर "देशी'शिवाय कशालाही हात (आणि तोंड!) लावलं नाही, त्यांनीही आम्हाला "ओबामा इज राईट!' असं स्वतःच्या लेफ्ट साईडला झोकांड्या खाता खाता सांगितलं. आता सध्याच्या ग्लोबलायझेशन आणि फ्री ट्रेडच्या जमान्यात हे स्वदेशी धोरण कितपत परिणाम करेल, हे काळच सांगेल. तरी ओबामा बरेच हुशार आणि जाणते आहेत. त्यांच्या आधीचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांना फक्त "जगाच्या नकाशात बेंगलोर दाखवा' असं कुणी सांगितलं असतं, तरी त्यांना घाम फुटला असता आणि त्यांचा चेहरा जर एखाद्या नवरदेवाला ऐन बोहल्यावर उभा असताना निसर्गाची जबरदस्त हाक ऐकू आली तर त्याचा चेहरा जसा होईल तसा झाला असता! पण बिचाऱ्या ओबामांनी अमेरिकेची सूत्रं अशा काळात हातात घेतली त्याला ते तरी काय करणार? बेरोजगारी कमी व्हायला तयार नाही, त्यात त्यांच्या नवीन धोरणांना रिपब्लिकन्सचा उघड, तर डेमोक्रॅट्सचा छुपा विरोध. जरा कुठे उसंत घ्यावी तर तेवढ्यात कोणी तरी "ओबामा अमेरिकन नाहीतच' किंवा "ओबामा तर मुसलमान आहेत' म्हणून आरडाओरड चालू करतं! मग त्यांनापण सहानुभूती (आणि मतं!) मिळवण्यासाठी कधीकधी अशा घोषणाबाजीचा आधार घ्यावा लागतो! पण या घोषणेवर आपल्या आयटी इंडस्ट्रीच्या एका (अनधिकृत) प्रतिनिधीची प्रतिक्रिया मस्त आहे. तो म्हणतो, "ओबामासाहेब, तुमची अवस्था किती वाईट आहे ते आम्हाला माहीत आहे. आम्ही तुमच्याच अमेरिकेतल्या "मेन' राज्यातलं "बेंगोर' नावाचं गाव सांगाल त्या किमतीला विकत घेतो आणि त्याचंच नामकरण "बेंगलोर' असं करतो. म्हणजे तुम्हाला सारखी बेंगलोरच्या नावानं बोटं मोडण्याची गरज पडणार नाही!' आता बोला?

## प्रतिक्रिया

On 17/11/2010 08:04 AM **param** said:

लेख खूप मस्त आहे .मार्केटिंग हा मीन प्रोब्लेम आहे आपल्या प्रोदुक्ट्स ना असे म्हणता येईल का?

On 11/11/2010 03:09 PM **Anagha** said:

एकदम मस्त

On 29/10/2010 04:04 PM **Pankaj** said:

फारच उत्कृष्ठ लेख आहे. गौतम यांची लेखनकला आम्हाला आधी पासूनच अवगत होती पण त्यांचे ललित लेख खूपच छान वाटतात. अनेक धन्यवाद ता. क.: पुलंचे लेख आठवून डोळे भरून आले.....

On 25/10/2010 07:22 PM **Jhopalele Jagrook** said:

जागरूक यांनी लेख झोपेत वाचला वाटते. "पण हे लक्षात घ्या कि बफेलो हे अमेरिकेमधील शहर आहे" हे लेखात पण दिले आहे व सर्वांना माहित पण आहे.

On 25/10/2010 09:06 AM **jagrook** said:

लेख छान आहे. पण हे लक्षात घ्या कि बफेलो हे अमेरिकेमधील शहर आहे. आणि ओबामांनी बफेलोतील सोफ्टवेअर इंजीनीर्स्ना पसंदी दिली तर त्यात काही अयोग्य नाही.

On 24-10-2010 07:08 **Richa** said:

मस्त लेख आहे. मजा आली वाचून.

On 22/10/2010 11:57 PM **Dhiru** said:

अगदी पुलं च्या शैलीत लिहिलेला लिख आहत.. खूप छान.. फक्त एकाच सांगणे..ओबामा हे एक राजकारणी आहते आणि असल्या घोषणा त्यांनी नाही तर कोणी करायच्या... हे सगळे आपल्या बेळगाव सीमाप्रश्ना सारखे आहे.. मी मारल्या सारखे करतो आही तू रडल्या सारखे कर..

On 22/10/2010 02:48 PM **Mihir** said:

छान आहे.

On 22/10/2010 02:24 PM **Ashutosh Pawar** said:

एक दम छान लेख आहे...

On 21/10/2010 02:44 PM **Sachin** said:

बंगलोर ला नाव ठेवायची ओबामा ची लायकी नाही, जय हिंद

On 21/10/2010 02:09 PM **Suhel** said:

गौतम .. लई भारी ... आवडलं आपल्याला . एक नंबर आहे !!

On 21/10/2010 11:56 AM **Abhijeet** said:

surekh...

On 20-10-2010 08:11 PM **asha** said:

खूपच छान लेख आहे हा.....मला अभिमान वाटत आहे या भारताचा आणि भारतीय होण्याचा आणि हसू पण येत आहे ....ओबामा वर.....

On 20/10/2010 03:34 PM **mahesh** said:

Prafull Shailendra, / operating system बद्दल तुमचा मत पटले एक वेळ पण software बद्दल काय? जागतिक पातळीवर स्वताचे नाव असलेले कोणते आहे का? असल्यास कोणत्या शेत्रात ? त्यसाठी संशोधन आणि नंतर जाहिरात यासाठी पैसे यांना घालावे लागतात ! आता बरीच वर्षे झाली कि "service" उद्योगातून पैसे कमवून..मग आता अशी अपेक्षा ठेवणे चुकीचेआहे का?

On 20/10/2010 11:02 AM **Prafull** said:

Shailendra, making operating system or hardware is not that difficult things. But how many of we purchase HCL or WIPRO laptops? Many engg. college students make their own operating systems as a mini project in curriculum. How many of we even use LINUX operating system against Windows? The thing is that we hv all kind of skills but our own people r not ready to support it not even government.

On 20/10/2010 10:23 AM **paresh** said:

संजय, just wait for 2 to 3 years we will lead global market with good products. for example tally. they are coming up with world class ERP

are coming up with world class ERP

On 19/10/2010 02:06 PM **Nitin** said:

अमेरिकेच्या बफेलोला आमचा मराठी रेडा भेटला म्हणजे कळेल.

On 19/10/2010 01:42 PM **Pravin** said:

छान

On 19/10/2010 10:56 AM **Charu** said:

Just too good! I needed a laugh. America needs another Clinton (not for affair ;)) to revive its economy. As far India, our talented engineers have bright future.

On 18/10/2010 11:24 PM **संजय,कॅनडा** said:

भारतातल्या इन्फोसिस , विप्रो सारख्या कंपन्या "services" पुरवतात ते ठीक आहे पण आपला स्वतःचा कोणता brand जागतिक पातळीवर पोहोचलाय ? उदा. विंडोज, जावा सारखी प्रणाली किंवा इंटेल सारखे hardware असे काहीच नाही. म्हणूनच आपल्या लोकांना इकडे 'सोफ्टवेअर कुली' म्हणले जाते. आपले स्वतःचे प्रोडक्ट्स जोपर्यंत बाजारात येत नाही तोपर्यंत भारत जास्त आवाज वाढवू शकत नाहीं. कार चा मेकानिक मोठा का कार उत्पादक मोठा ?

On 18/10/2010 09:23 AM **mahesh joglekar** said:

Shailendra म्हणतो ते बरोबर आहे.. सुरुवातीला ठीक होते ..आज इन्फोसिस , विप्रो सारखे "services" पुरवून पैसे वाले झाले पण स्वतचे असे काही "उत्पादन" आत्ता तरी काढता आले पाहिजे! "संशोधनावर" भारतीय उद्योगांना फारसा खरच कार्याला आवडत नाही म्हणून अशी परिस्थिती" त्यामानाने महिंद्र सारखे उद्योग आपली उत्पादने निर्यात करीत आहे हे कौतुकास्पद आहे

On 18/10/2010 09:18 AM **mahesh** said:

चांगले निरीक्षण खास करून कोल्हापुरी संवाद अगदी बरोबर .. नाहीतर बरेचजण कोल्हापुरी च्या नावाखाली काहीही फेकतात, उदाहरण : कोल्हापूर जरी सांगली पासून फार दूर नसले तरी कितीतरी लेखकांना हा सूक्ष्म बदल कळत नाही!

On 17/10/2010 07:19 PM **rpb** said:

मस्त लेख आहे म्हशींचा भाग खुदकन हसवून जातो...असे लेखन आजकाल विरळ होत आहे. निरीक्षण उत्तम.

On 17/10/2010 06:55 PM **Abhay** said:

Shailendra has written right thing. We have to focus on Product base and not on service base.These Americans will stop Outsorcing at any time dont believe them.

On 17/10/2010 06:46 PM **राजेश पाटील, पुणे** said:

नाव गौतम "पंगू" पण लेखणी "पंगू" नाही बरं का !! चांगली सुध्धढ आहे की !! माय मराठीची 'पांग' फेडणारी आहे !! नॉर्थ कॅरोलिना ला जातांना तुमच्या लेक्सिंग्तन वरून जात असू आम्ही. पण त्या गावात आपण आहात हे नव्हते माहित !! भेटलो असतो तुम्हाला सवड असली असती तर !!! (ता.क. लेखकासाठी - तुमचे नाव विनोदासाठी घेतले आहे - वैयक्तिक दोष काढण्यासाठी नव्हे - वाईट वाटल्यास क्षमा असावी).

On 17/10/2010 06:34 PM **adisunn** said:

हा लेखक एव्हडा का अमेरिकी देवशी आहे.. अमेरिकेने भारताला बरेच काही दिले आहे.. IT द्वारे पैसा तर बराच आल आहे... पण त्यापेक्षा... शास्त्र सामुग्री, संगणक प्रणाली - micrososft, apple, hp, dell, ibm वगैरे..पासून ते boaing plains, medicines वगैरे ... नाहीतर आपण आजून शेतीच करत बसलो असते... आफ्रिका आणि बरतात काहीच फरक राहिला नसता... thank to British and Americans...

On 17/10/2010 06:03 PM **vivek** said:

Changla lekh aahe. Sadya paristhitivar upahasatmak lekh aahe. ugach aika lekhatun problem sodawnyachya aav aanala nahi he changle kele aahe.

On 17/10/2010 05:44 PM **ajay** said:

ओ "अमेरिकन " अर्थतज्ञ -- globalization चा भस्मासुर इतका मोठा झाला आहे कि -- आता Globalization भस्मासुर वाटायला लागलं का? नव्वदीच्या दशकात तर आमच्या भारत देशावर globalization साठी तर खूप दबाव टाकत होता तेंव्हा काय झाला होतं आता त्याच globalization मुळे आमचा थोडा फायदा होऊन चार घास पोटात जायची सोय झाली तर पोट दुखतंय हो तुमचे? वा रे अमेरिकन....तसा हा खेळ तुमच्या संस्कृतीलाधरूनच आहे म्हणा ....

On 17/10/2010 04:11 PM **vijay chitale ,indore** said:

The article is full of punches that may pinch us ,but once one is in the arena one has to prove one"s worth only by counter -punches without finding fault with either the spectators or the referee,or the rules of the game .

On 17/10/2010 03:00 PM **Sangram** said:

khup khup chan!

khup khup chan!

On 17/10/2010 01:18 PM **Amruta** said:

सही लिहिला आहे. १ नंबर

On 17/10/2010 01:05 PM **American artha tadnya** said:

globalization चा भस्मासुर इतका मोठा झाला आहे कि आता गांधीजी किंवा मार्टिन लुथर किंग सारखे बदलाचे वारे खेळवू शकणारा माणूस च अमेरिकेची नाव तरुण नेऊ शकतो. स्वदेशी हि अतिशय सुंदर चळवळ आहे. गांधीजींचा स्वयंपूर्ण खेड्यांचा विचार फार सुंदर आणि परी पूर्ण आहे. मेड इन अमेरिका चळवळ लोकां मध्ये पोहोचली तरच इथे नोकर्या उपलब्ध होतील. अन्यथा ३०० million लोकांना नुसती शस्त्रास्त्रे विकून पोसणे शक्य नाही ...

On 17/10/2010 12:53 PM **rahul** said:

झकास...............................

On 17/10/2010 11:52 AM **N M BHALERAO** said:

मस्त लेख आहे. पु ल देशपांडे व जयवंत दळवी यांची आठवण झाली. वक्रोक्ती व व्यंगात्मक हे दोन्ही चांगले जमले आहे.

On 17/10/2010 11:47 AM **vijay** said:

फारच सुंदर शैली आहे यांची..मस्त आवडला

On 17/10/2010 11:43 AM **Pradeep** said:

Nice...........Good to read Better to understand and Best to entertain............

On 17/10/2010 10:43 AM **Sambhaji Chougule** said:

Excellent article.... !!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!!

On 17/10/2010 10:43 AM **Rahul (Pune)** said:

छान , वाचनीय आहे !

On 17/10/2010 10:29 AM **Shitalkumar Patil** said:

१ नंबर :)

On 17/10/2010 10:07 AM **Shailendra** said:

लेख चांगला आहे . परंतु जो पर्यंत भारत सेर्विसिस नाहीं तर product export करण्यात अग्रीम देश बनत नाहीन तो पर्यंत भारत जास्त आवाज वाढवू शकत नाहीं . माझी इच्चा आहे कि भारता नि स्वतः ची hardware आणि operation system बनवावी . Manufacturing , heavy machinary आणि electornics/electrical मधले स्वतः चे products बनवावे .

On 17/10/2010 09:20 AM **Kam** said:

खूपच छान

On 17/10/2010 08:19 AM **sudhir kaulgud** said:

छान आहे लेख . वाचण्यासारखा आहे.

On 17/10/2010 07:42 AM **नील** said:

मस्तच :)

On 17/10/2010 07:04 AM **mahale** said:

चांगला लेख

On 17/10/2010 04:23 AM **abhu** said:

majaa वाटली

On 17/10/2010 03:57 AM **Abhijeet Shirgurkar** said:

एक नंबर लेख आहे !!

On 17/10/2010 03:49 AM **ravi** said:

लई भारी रे तू... सगळा किनई कोल्हापुरी भाषेत लीवलास कि रे...

On 17/10/2010 02:39 AM **amol** said:

लेख खूप सुंदर आहे आणि लेखन शैली हि अत्यंत विनोदी आहे. पुन्हा लिहा.

On 17/10/2010 01:51 AM **Shubhangi** said:

Excellent and really funny!

On 17/10/2010 01:05 AM **Ravi** said:

गुड One . मजा आली वाचून. छान लेख लिहिला आहे.

On 17/10/2010 12:53 AM **gaurav** said:

छान लेख ....

**तुमची प्रतिक्रिया लिहा** Login

* **Name:** * **Email:**

* **Comment:** (Press Ctrl+g to toggle between English and Marathi)

0/500

powered by Google™

अ आ इ ई उ ऊ ए ऐ ऑ ओ औ अं अः

क का कि की कु कू कॅ के कै कॉ को कौ कं कः

क ख ग घ ङ च छ ज झ ञ ट ठ ड ढ

ण त थ द ध न प फ ब भ म य र ल

व श ष स ह ळ क्ष ज्ञ

Submit

**File USA Taxes From India**
Are you US resident living in India Pls contact ,FREE intl Consultation
www.UsIndiaTax.com
AdChoices

© Copyrights 2009 eSakal.com - All rights reserved. **Powered By:** **of**